# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक **VISHWA PANTHASTHA**

वर्ष : ५ । अंक : १ । मार्च २०२२ (मासिक) । मूल्य ₹ १०० । AED 10 | US$ 2 www.panthastha.com





















# अनुक्रमणिका


विश्व पांथस्थ
अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

विश्व पांथस्थ
वर्ष ५ अंक १
मार्च २०२२

Vishwa Panthastha
Year 5 Issue 1
March 2022

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

First Marathi Monthly For NRI Maharashtrian

संपादक
संदीप वसंतराव कडवे

Editor
Sandeep Vasantrao Kadwe

संपादकीय व वितरण साहाय्य

Editorial & Distribution Support

राजन तावडे, अबू धाबी
गजानन खोलगडे, बहरीन
धवल नांदेडकर, फुजेरा
वीरभद्र कारेगावकर, अजमान
नितीन गायकवाड, औरंगाबाद

Rajan Tawde, Abu Dhabi
Gajanan Kholgade, Bahrain
Dhawal Nandedkar, Fujerah
Veerbhadra Karegaonkar, Ajman
Nitin Gaikwad - Aurangbad

मुखपृष्ठ आणि सजावट
सौ.मानसी कुलकर्णी,(मानसी आर्टस्)पुणे

Cover & Design
Manasi Kulkarni (Manasi Arts) Pune

मूल्य ₹ 100 | AED 10| US$2

Price : ₹ 100 AED 10 US$ 2

विश्व पांथस्थ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी ए-७०३, निसर्ग सिटी-२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे - ४११०५७ येथे प्रसिद्ध केले.
**संपादक - संदीप वसंतराव कडवे**
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

'Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe, and published at A-703, Nisarg City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune -411057.
Mob.: +91 9860678844
e-mail: editor@panthastha.com
website: www.panthastha.com
Editor - Sandeep Vasantrao Kadwe (Responsible for Selection of News & Articles under the PRB Act.)


**या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**


**FORM IV**

Statement about ownership and other particulars about newspaper VISHWA PANTHASTHA to be published in the first issue every year after the last day of February

**1. Place of publication :** A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune -411 057.

**2. Periodicity of its publication :** Monthly

**3. Printer's Name :** Sandeep Vasantrao Kadwe Nationality : Indian Address : A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.

**4. Publisher's Name :** Sandeep Vasantrao Kadwe
**Nationality :** Indian
**Address :** A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.

**5. Editor's Name :** Sandeep Vasantrao Kadwe
**Nationality :** Indian
**Address :** A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune -- 411 057.

6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding More than one per cent of the total capital.
Sandeep Vasantrao Kadwe
A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune-411 057.
I, Sandeep Vasantrao Kadwe, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Sd/ Signature of Publisher

Date: March 2022

## संपादकीय



# सत्पात्री खर्च

> सत्पात्री दान ऐकले आहे, सत्पात्री खर्च म्हणजे काय. म्हणजे सत्पात्री पैसे कसे खर्च करावे, सत्पात्री वेळ कसा खर्च करावा, सत्पात्री शब्द कसा खर्च करावा?

दानाला फार पूर्वीपासून महत्व आहे. दान केल्याने पुण्य वाढते म्हणतात. सत्पात्री दान महत्वाचे. मुळातच दान दिल्यावर त्यापासून काही लाभ होईल हि संकल्पनाच दान या संकल्पनेशी विसंगत आहे. पण तरीही दान कोणाला द्यावे याचे काही संकेत आहेत. ज्याला खरोखर गरज आहे अशा व्यक्तीलाच म्हणजे याचकाला व ज्याची गरज आहे अशाच वस्तूचे, जी मुळातच यजमानानी स्वकष्टाने कमावली आहे व यजमानाच्या मालकीची आहे अशाच वस्तूचे दान योग्य वेळीच व योग्य ठिकाणीच करावे असा संकेत आहे. नसेल तर तसा संकेत पाळावा. तरच दान घेणाऱ्याला व देण्याऱ्याला लाभते व असेच दान सत्पात्री म्हणवते.

दान व खर्च यात फरक आहे. खर्च आपण आपल्या गरज पूर्ण करण्यासाठी करतो व त्यात व्यवहाराचा फार मोठा भाग आहे. आपल्या भौतिक, बौद्धिक, कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक, अनेक गरजा पूर्ण करण्यासाठी आपण काहींना काही खर्च करत असतो. अर्थात पैसे खर्च करणे या पलीकडेदेखील आपल्या मालकीचे शब्द, आपला बहुमूल्य वेळ, आपले शारीरिक व मानसिक श्रम आपण खर्च करत असतो. आजकाल तर खूपदा आपण आपले पैसेच नाही तर आपली शारीरिक मानसिक ऊर्जा, आपला बहुमूल्य वेळ, आपला अमूल्य शब्द कुणासाठी तरी अथवा कशासाठी तरी जवळपास फुकट खर्च करत असतो. हा फुकट खर्च करण्यासाठी आपल्याला अनेकदा बाध्य केले जाते. अनेकदा बळजबरीने आपल्याला मनात नसताना हे सर्व खर्च करावे लागते. काही वेळा रूढी परंपरा नीतिसंकेत पाळण्यासाठी, काही वेळा नातेसंबंध जपण्यासाठी, टिकवण्यासाठी, काहीवेळा वैयक्तिक, कौटुंबिक, राजकीय अथवा सामाजिक अपरिहार्यता म्हणून आपण आपला पैसे, वेळ, शब्द, शारीरिक व मानसिक श्रम खर्च करत असतो. त्यातून काहीवेळा आनंद मिळतो, खूपदा मनस्ताप वाट्याला येतो. मग प्रश्न पडतो, आपण हे सगळे का करतो? का करावे? जर करायचेच असेल तर त्यासाठी आपण यजमान म्हणून खरंच सक्षम अथवा पात्र आहोत का? म्हणजे जे खर्च केले जाते ते पैसे, वेळ, श्रम, वगैरे तरी आपले स्वतःचे असते का? त्यावर इतर कुणाचा हक्क किंवा अधिकार असण्याची शक्यता असते का? असेल तर मग आयजीच्या जीवावर बायजी उदार याप्रमाणे आपण इतक्या निष्काळजीपणाने ते पैसे, वेळ, श्रम का खर्च करतो किंवा वाया घालवतो?

थोडक्यात सत्पात्री खर्च कसा करावा? मुळातच सर्वसामान्य माणसाकडे फारसा पैसा नसतो, वेळ देवाने सगळ्यांना सारखा वाटून दिलेला आहे, त्यामुळे तो फुकट असला तरी महत्वाचा आहे, श्रम केल्याशिवाय तर काहीच मिळत नाही त्यामुळे तेही मर्यादित आहेच. मग ज्या गोष्टीचा अतिसंचय आपल्यापाशी नाही ती आपण अगदी राजासारखी उधळून टाकतो याचे मला नेहमी आश्चर्य वाटत आले आहे.

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका पाहणी अहवालात असे दिसून आले कि जगातील केवळ ६% श्रीमंत लोकांकडे उरलेल्या इतर ९४% गरीब लोकांकडे आहे तेवढी संपत्ती एकवटलेली आहे. हा झाला संपत्तीचा अतिसंचय. अंबानी, अडाणी, तेंडुलकर, मंगेशकर, झुकरबर्ग, गेट्स, वगैरे संपत्तीचा अतिसंचय करण्यासाठी प्रसिद्ध. सत्तापिपासू नेत्यांची नावे मी घेत नाही. तुम्ही सुज्ञ आहात. हा बहुतांशी पैसा त्यांनी जाहिरातीतून व आपण दिलेल्या पैश्यातून, वेळेतून, आपण लक्ष दिले म्हणून कमावला. नेता, अभिनेता, बिझनेस, कलाकार किंवा खेळाडू म्हणून मानधन मिळाले त्यापेक्षा कित्येक पट जास्त पैसा जाहिरातीतून कमावतात. त्या जाहिराती आपण बघितल्या म्हणून कमावतात. नंतर त्याच पैशाचा वापर करून अजून पैसा कमावतात. पैसे कमावणे वाईट नाही. फसवून, भ्रमित करून, गैरमार्गाने पैसा कमावणे वाईट. पैशाचा अतिसंचय वाईट.

तर जिथे अतिसंचय होतो ते सर्व कुजते हा निसर्ग नियम आहे. सगळ्या जाहिराती अमिताभ, सलमान, शाहरुख, सचिन तेंडुलकर, सचिन पिळगावकर वगैरे तत्सम यांनी का कराव्या? तर म्हणे त्यांची ब्रँड व्हॅल्यू आहे. कोणी ठरवली? बाजाराने. आपण तर नाही ना. म्हणजे आपण त्या बाजाराचा हिस्सा झाला असू तर आपण त्या बाजारातून वेगळे व्हायचे इतके ते सोपे आहे. इतका पैसा गोळा करून ते त्याचे काय करतात? समाजाला परत देतात? तर नाही, टॅक्स प्लांनिंगसाठी लागतील तेव्हढे दान केल्यासाखे करतात, त्यातही त्यांची ब्रँड व्हॅल्यू वाढवून ठेवतात. त्यांनी ऍडव्हरटाइज केलेले प्रॉडक्ट्स आपण घेण्यापेक्षा जर ती रक्कम नवोदित होतकरू उद्योजक, समाजसेवक, सत्कर्मी, सदविचारी, खरोखरच्या हिरोंनी ऍडव्हरटाइज केलेल्या प्रॉडक्ट्स व सर्विसेस वर आपण खर्च केली तर त्या खरोखरच्या हिरोंना व सज्जनांना तेव्हढाच हातभार, आपल्यातर्फे मानधनच म्हणा ना. अति संपत्तीचे व अति सत्तेचे विकेंद्रीकरण केले तर संपत्ती व सत्ता खेळती राहते, कुजत नाही, त्यातून काही चांगले कार्य उभे राहू शकते. तर पटला का हा विचार?

आपला पैसे आपण कुठे खर्च करावा याचे स्वातंत्र्य आपल्याला असावे कि नाही? आपला मेहनतीचा पैसा सत्पात्री खर्च व्हावा असे तुम्हाला वाटत नाही? म्हणजे तुम्ही कष्टाने कमावलेला पैसा हा तुमच्या गरजांसाठी तुम्ही खर्च करणारच. पण तो सत्पात्री खर्च व्हावा. म्हणजे योग्य व्यक्तींनी तयार केलेल्या उत्पादनांवर, सेवांवर (मराठीत प्रोडक्टस व सर्व्हिसेस वर) खर्च व्हावा असे तुम्हाला वाटतच असेल. नसेल वाटत तर तसे वाटले पाहिजे. कारण सद्विचारांनी प्रेरित व सत्कार्य करणारी व्यक्तीचे यामुळे महत्व वाढून त्यांच्या कार्याला आपल्यातर्फे थोडा हातभार लागू शकतो. मुख्य म्हणजे असा पैसा पुन्हा आपल्याकडे येऊ शकतो.

हा विचार जसा आपण पैशाच्या बाबतीत करतो, तसाच तो वेळेच्या बाबतीतदेखील आपण करायला हवा. म्हणजे आपण आपला अमूल्य वेळ कुणासाठी खर्च करतो याचे आत्मपरीक्षण आपण केले पाहिजे. उदाहरणार्थ, आपण उगाच एखाद्या सत्तापिपासू नेत्याच्या, चमको सेलिब्रिटींच्या, स्वार्थी समाजसेवकाच्या नादी लागून त्याचे कार्यक्रम बघण्यात, गर्दीचा एक भाग होतो का? म्हणजे बहुतेक ठिकाणी त्यांना तुमचा वापर केवळ गर्दी म्हणून करायचा असतो. तर तुम्ही अशा गर्दीचा भाग का होता? लोकं वेड्यासारखे अशा सत्तापिपासू नेत्याचे, स्वार्थी चमकोचे समर्थन करत आपला वेळ, पैसे दोन्ही वाया घालवतात. इतकेच नाही तर, सोशल मीडिया व इतर ठिकाणी त्यांचे समर्थन करत बसतात. त्या चमकोना, सत्तापिपासूंना तुमचे काही पडले नसते. तुम्ही त्यांना भेटायचा प्रयत्न करा, त्याच्या आसपास देखील जाऊ शकणार नाही. त्यांना फोन करायचा प्रयत्न करा, त्याच्या सेक्रेटरीच्या चमच्याच्या जवळ

देखील तुम्ही पोहोचू शकणार नाही तुमचे एखादे काम करणे दूर, ते तुम्हाला आपल्या आसपास पण फिरकू देत नाही. आणि तुम्ही कुठल्यातरी समारंभात त्याच्या जवळ जाऊन काढलेल्या फोटोवर संपूर्ण आयुष्य काढतात, तो फोटो दाखवत समाजात प्रौढी मिरवत राहतात. अशा फोटोची त्यांच्या लेखी काहीच दखल नसते. त्यापेक्षा आपला वेळ सत्कारणी लावा. योग्य व्यक्तींच्या सहवासात, त्यांच्या कार्यात सहभागी होऊन, आनंदाची व योग्य मूल्यांची निर्मिती मारण्यात घालवा.

आपल्या शब्दांचे पण असेच आहे. आपले शब्द योग्य व लायक व्यक्तींच्या साठीच खर्च करा. अयोग्य व्यक्तींच्या साठी खर्च करू नका. यामुळे अनेक गोष्टी घडतील. एक म्हणजे लायक व योग्य व्यक्तींना व त्यांच्या प्रामाणिक कार्याला प्रोत्साहन मिळेल, अयोग्य व्यक्तींना दंड मिळेल व सर्वात महत्वाचे म्हणजे तुम्हाला सत्कार्य केल्याचे समाधान केलेलं. आणि हो, यासाठी तुम्हाला पैसे खर्च करावे लागणार नाही किंवा फार काही वेळ खर्च करावा लागणार नाही. फक्त योग्य वेळी, योग्य ठिकाणी योग्य व्यक्तीचे व कार्याचे समर्थन करायचे, त्याला सन्मान द्यायचा व तसेच योग्य वेळी, योग्य ठिकाणी अयोग्य व्यक्तीचा व अयोग्य कार्याचा आपल्या पद्धतीने सौम्य वा तीव्र शब्दात निषेध करायचा व त्याला मान द्यायचा नाही. ती कितीही मोठी व्यक्ती असली तरीही. कारण त्याचे मोठेपण तुम्ही त्यांना किती मोठेपण देतात यावर अवलंबून आहे. ज्याक्षणी तुम्ही अयोग्य व्यक्ती व अयोग्य कार्याला मान द्यायला सुरवात करतात, तुम्ही तुमच्या पायावर धोंडा मारून घेतात. सत्कर्मी, योग्य, सद्विचारी व्यक्ती व कार्याला प्रोत्साहन देऊन तुम्ही तुमच्याभोवती एक सुरक्षा कवच निर्माण करता.

आता सगळ्यात महत्वाचा भाग. असे सत्पात्री शोधायचे कुठे? ज्यांच्यावर आपला कष्टाचा पैसे, महत्वाचा वेळ व अमूल्य शब्द खर्च करावा अशा व्यक्ती व असे कार्य शोधावे कुठे? याकरता मंडळी, तुम्हाला थोडेसे सजग, सतर्क राहावे लागेल, आपल्या आसपास डोळे व कान उघडे ठेवून वावरावे लागेल, थोडीशी मेहनत करावी लागेल. अशा व्यक्ती, प्रकल्प, कार्य तुम्हाला तुमच्या आसपासच सापडतील. ते आपल्यातीलच एक असतील. पण तुम्ही कधी उघड्या डोळ्यांनी, सकारात्मक दृष्टीने त्यांची दखलच घेतली नसेल. आता घ्या. त्यासाठी थोडे बोलावे लागेल, थोडी माहिती करून घ्यावी लागेल, थोडी चाचणी करावी लागेल. संपर्कात आलेला प्रत्येक व्यक्ती व प्रत्येक कार्य दखल घेण्याजोगे नसेलही कदाचित, पण तुम्ही शोधायला सुरवात तर करा. आपल्या कोशातून बाहेर तर पडा. संपर्क तर करा, संवाद तर करा, तपासून तर पहा. अशी नररत्ने नारीरत्ने व सत्कर्मे नक्की सापडतील. जवळच सापडतील. पांथस्थ तर्फे आम्ही हा शोध चालूच ठेवला आहे व त्यासाठी अनेक उपक्रम करत समाजाच्या जास्तीत जास्त थेट संपर्कात राहण्याचा प्रयत्न करत आहोत.

अशा चांगल्या सत्कर्मी लोकांच्या मुलाखती घ्या, आम्ही त्या पांथस्थ मध्ये प्रसिद्ध करू, त्यांना व त्यांच्या कार्याला प्रोत्साहन देऊ. चांगल्याला चांगल्याची साथ मिळाली कि चांगल्याची वाढ होण्यास मदत होते. या विचाराला प्रोत्साहन दिले तर एक नवीन चळवळ उभी राहील, ना जाणो उद्या समाज तुम्हालाच नररत्न वा नारीरत्न म्हणून तुमचा गौरव करेल. तुम्हाला एखादे चांगले कर्म करण्यास प्रवृत्त करेल. ज्याचा फायदा तुम्हाला, तुमच्या कुटुंबाला व पर्यायाने तुमच्या आसपास असलेल्या समाजालाच होईल.

मुख्य म्हणजे या समुद्रमंथनातून अयोग्य रत्ने म्हणजेच सामाजिक विष वल्ली देखील बाहेर पडेल. त्या विषवल्लीला ओळखा. त्याचे काय करायचे ते आता तुम्हाला माहित आहे. वाईटाला वाईट म्हणणे आवश्यक आहेच. आपला बहुमूल्य वेळ, पैसे, शब्द, श्रम अशा वाईट व्यक्ती, प्रवृत्ती, प्रकल्प अथवा उद्योग यांच्या वाढीसाठी खर्च होणार नाही याकडे लक्ष द्यावे लागेल.

तर सत्पात्री खर्चाला सुरवात करतायना? शुभस्य शीघ्रम ! शुभेच्छा.

– डॉ संदीप कडवे, संपादक, विश्व पांथस्थ.









- निलेश अभंग

निलेश अभंग यांचा स्वतःचा व्यवसाय आहे, मध्यंतरी फार मोठ्या आजारातून ते बरे झाले व त्यानंतर मोठ्या जिद्दीने त्यांनी कल्याणमध्ये हा व्यवसाय उभा केला आहे. त्यानिमित्त त्यांचे महाराष्ट्रभर, तसेच बाहेरील देशात देखील सर्विस एजेंटचे जाळे पसरलेले आहे. मर्यादित वेळेत, माफक फीस मध्ये लीज या रेंटल कॉन्ट्रॅक्ट घरपोच सेवा असे याचे सर्वसाधारण स्वरूप आहे. GIG मॉडेलचा वापर करूनच त्यांना आपला व्यवसाय करता येतो, म्हणून, या संकल्पनेची ओळख त्यांच्याच शब्दात.

अलीकडे वेगळ्याच धाटणीचे बिजनेस मॉडेल्स येत आहेत. गेल्या काही वर्षात निश्चित मासिक पगार द्यायचा नाही, जेव्हढे काम तेव्हढे पैसे, म्हणजे कामगार जीव तोडून काम करतील अशा प्रकारचे बिझनेस मॉडेल्स आले आहेत अन ते जोरदार यशस्वी झाल्याचे दिसते. ओला, उबेर, झोमॅटो, स्वीग्गी, फूड पांडा, फ्रांझो, वगैरे ही सारी Gig business ची उदाहरणे आहेत.

यातील बहुतांशी व्यवसाय उद्योग घरपोच सेवा देणाऱ्या प्रकारात आहेत.

'Gig' हा शब्द अमेरिकेत जाझ म्युझिशिअन्स कडून १९२० मध्ये लाईव्ह म्युझिक परफॉर्मन्स साठी वापरला गेला. विशिष्ट वेळेपुरते विशिष्ट जागी (Hotel, auditorium) परफॉर्मन्स करून त्या दिलेल्या वेळेचा मोबदला घेणे म्हणजे Gig. म्हणजे फ्रिलान्स काम. यात कामगाराला, कलाकाराला, मासिक पगार, भत्ते, वगैरे मिळत नाही, जितके तास काम, किंवा जितके युनिट काम, तितका मोबदला. काम करा, पैसे घ्या, असे.

हेच मॉडेल अलीकडे बरेचसे स्टार्ट अपस वापरताना दिसतात.

Zomato,Swiggy ची मुले पगारावर नसतात, deliveries नुसार त्यांना पैसे मिळतात, Ola-Uber चे drivers पगारावर नसतात, ट्रिपनुसार त्यांना पैसे मिळतात. म्हणजे ते कंपनीचे Gig म्हणून काम करतात.

ह्या वर्क मॉडेल मुळे मालकाचा वा कंपनीचा खूप जास्त फायदा होताना दिसतो आहे. जागा, जमीन, Product, कामगारांचे पगार वगैरेमध्ये त्यांना आधीच्या तुलनेत जास्त पैसे गुंतवावे लागत नाहीत. त्यांना त्यांच्या सिस्टम मध्ये, सॉफ्टवेअर मध्ये, जाहिरातीसाठी, Gigs च्या नोकर भरतीत आणि त्यांच्या ट्रेनिंगमध्ये श्रम आणि पैसा ओतावा लागतो.

GIG Business मध्ये कंपनी एक प्रकारचे ठोक्याने–गुत्त्याने–ठेकेदारीने–कंत्राटाने GIG ला काम देते. मोठ्या कंपन्या खूप सारे GIGs जमवून त्यांच्यातच स्पर्धा लावून त्यांच्याकडून त्यांच्या ग्राहकांसाठी उत्तमोत्तम सेवा करवून घेतात.

कामगारांच्या मासिक पगाराची जबाबदारी न घेता उभारलेली ही साखळी आहे, यात काम मिळवण्यासाठी कामगारांना कामाप्रती अतिशय तत्पर, सजग, चोख, पारदर्शी (कामाच्या स्वरूपानुसार) असावे लागते, तरच काम मिळते, अन्यथा नाही.

कोरोना व लॉकडाऊन च्या काळात बऱ्याच छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना उद्योगांना कामगारांना कमी करावे लागले, मात्र कंपनी पुन्हा सुरू झाल्यावर त्यांना कामगारांच्या श्रमाची-कौशल्याची गरज भासू लागली, तेव्हा त्यांनी कामगारांना थेट पेरोल वर न घेता (म्हणजे कायम स्वरूपी कामगार म्हणून न घेता) Gig (म्हणजे हंगामी कामगार) म्हणून घेतले.

**✻ उदाहरण देतो.**

माझ्या घर भाडेकरारच्या रजिस्ट्रेशनच्या कामासाठी आम्हाला ग्राहकाच्या घरी किंवा ऑफीसमध्ये जाऊन रजिस्ट्रेशन करावे लागते, त्या कामाला साधारण अर्धा तास लागतो. काम झाल्यावर ऑफिसमध्ये येऊन ते दस्त किंवा डॉक्युमेंट संबंधित दुय्यम निबंधकाकडे नोंदणी साठी व अप्रूव्हलसाठी प्रोसेस करावे लागते. दस्त मंजूर झाला कि त्यांच्या प्रिंट काढून ग्राहकांना प्रिंटेड कॉपी पोहोच कराव्या लागतात. म्हणजे एकदा रजिस्ट्रेशन करण्यासाठी अन एक कागदपत्रे डिलिव्हरी करण्यासाठी असे दोनदा ग्राहकाकडे जावे लागते. त्यासाठी वेळ जाई, पेट्रोल वापरले जाई, मोटरसायकलचा खर्च, शिवाय त्या दोन ते तीन तासात इतर इनकम वाढवण्याची कामे करता आली असती, ती होत नसत.

त्यासाठी एक तर स्वतः कागदपत्रे घरपोच करा हा पर्याय शक्य नव्हता, म्हणून तो टाळला. अथवा एखादा डिलिव्हरी बॉय किंवा ऑफिसबॉय स्वतःकडे नोकरीवर ठेवणे गरजेचे होते. त्याला पेट्रोल खर्च, मोटरसायकल, पगारपाणी द्यावे लागणार. त्याच्या सुट्ट्या, आजार औषधपाणी, त्याच्या घरात येणारे लग्न, समारंभ सांभाळून राजा देऊन करावे लागणार. त्याच्या कलाने जावे लागणार. त्यापेक्षा मी एका स्थानिक कुरिअर कंपनीला संपर्क केला, त्यांना दिवसाला दहा कुरियर करण्यासाठी पाकिटे देऊ, ८ तासात त्याच दिवशी डिलिव्हरी कराल का, असे विचारले. ते हो म्हणाले.

आता ते गेली दोन वर्षे रोज माझ्या कामाच्या जागी येऊन डॉक्युमेंट्स घेऊन जातात अन माझ्या ग्राहकांना त्याच दिवशी डिलिव्हरी करतात. हे एक फ्रिलान्स काम - Gig च आहे, ज्याने माझे काम सोपे झाले अन माझा माणसांना हाताळून काम करवून घेण्याचा ताण वाचला.

प्रत्येक बिझनेस मॉडेल चे फायदे-तोटे असतात, तसे याचेही आहेत.

मात्र Freelance work करू इच्छिणाऱ्या, वेळेच्या flexibility ची आवश्यकता असलेल्या लोकांसाठी ही कल्पना खूप helpful आहे. मात्र यासाठी सतत स्वतःला updated ठेवणे, Networking करणे, कामे मिळवण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. Gigs साठी Online Platforms उपलब्ध आहेत. तिथे आपल्या work profile ची माहिती upload करून कामे मिळवली जाऊ शकतात. शिवाय ह्या डिजिटल युगात जगभरातून कामे मिळवता येऊ शकतात.

येणाऱ्या काळात GIG Economy बराच धुमाकूळ घालणार आहे, असे दिसते. शिवाय प्रत्येकाला skilled, competent राहणे नितांत गरजेचे असणार आहे. रोजगार वा जॉब मिळवू इच्छिणाऱ्या प्रत्येकाला business skills विकसित करण्याशिवाय पर्याय नसणार आहे.

भारतात सध्या हे Self Employed पध्दतीचे Business Model भ्रूणावस्थेत आहे, जे वेगाने अंग धरत आहे.

**तळटीप** : मोठ्या कंपन्या सुरुवातीला Gigs ना उत्तम परतावा देत असल्या तरी कंपनीने मार्केटमध्ये उत्तम penetration केल्यानंतर त्या Gigs ना पिळून काढणार हे जवळजवळ नक्कीच आहे. कारण कंपन्या तळाला असलेल्या साऱ्या Gigs मध्ये प्रचंड स्पर्धा घडवून आणून नफ्याचा मोठा वाटा स्वतःकडे वळता करून घेतात.

- निलेश अभंग, कल्याण

# फर्स्ट संडे - नाविन्यपूर्ण सामाजिक मंच

**First Sunday**

Innovation | Interaction | Collaboration|
Entrepreneurship | Sustainable Growth |

२०२० व २०२१ हि दोन वर्षे अनेकांची व्यावसयिक, कौटुंबिक, सामाजिक, व्यक्तिगत व आर्थिक घडी विस्कटून देणारे ठरले. विद्यार्थी शाळेत जाऊ शकते नाही म्हणून शिक्षणाचा संपूर्ण अनुभव घेऊ शकले नाही. वारंवारच्या लॉकडाऊनमुळे उद्योग व्यापार व्यवसायाची वाताहात झाली. वर्क फ्रॉम होम चा चाकरमान्यांनी धसका घेतला, पण आता त्यांना घराच्या बाहेर पडायला देखील अढी निर्माण झाली आहे. त्यांनाच नाही तर सर्वानाच घराच्या बाहेर पडून एकमेकांशी भेटण्यात फार स्वारस्य उरले नाही. त्यामुळे बरेच जण ऑनलाईनच्या आभासी जगात वावरत आहेत. पण त्याचा फार मोठा तोटा झाला आहे. आपापसातले सौहार्द व संवाद कमी झाले. गैरसमजांचे जाळे पसरले. निर्मळ प्रगतीचा जणू मार्गच खुंटला.

५ सप्टेंबर २०२१ रोजी डॉ.संदीप कडवे व डॉ. के. सी. मोहिते शिक्षकदिनाचे औचित्य साधून पुणे युनिव्हर्सिटी येथे भेटले व या परिस्थितीची चर्चा केली. त्याचे काही सहकारी या चर्चेत सामील होते. फर्स्ट संडे या उपक्रमाचा पाया याच भेटीत रचला गेला. प्रत्यक्ष भेटून सुसंवाद वाढावा म्हणून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी एका निश्चित ठिकाणी निश्चित वेळेला भेटावे असे ठरले. कुणालाही या मिटिंगमध्ये सामील होता यावे म्हणून पुणे युनिव्हर्सिटीच्या नवीन फूड मॉलमध्ये रविवारी सकाळी ८.३० ते १०.३० या वेळेत भेटायचे निश्चित झाले. ३ ऑक्टोबर २०२१ रोजी या उपक्रमाचा शुभारंभ पुण्यात झाला. ५ डिसेंबर २०२१ रोजी नासिक चॅप्टरचा प्रारंभ झाला. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी यु.ए.इ म्हणजेच संयुक्त अरब अमिरात अर्थात दुबई येथे फर्स्ट संडेच्या तिसऱ्या चॅप्टरचा शुभारंभ झाला. यु.के. चॅप्टर सुरु करण्याबाबत तयारी चालू आहे. मुंबई चॅप्टरसाठी योग्य जागेचा शोध चालू आहे. केवळ सहा महिन्याच्या आत तीन चॅप्टर सुरु झाले व उपक्रमास उत्तम प्रतिसाद मिळतो आहे, यावरून या उपक्रमाची किती गरज होती ते लक्षात येते.

इनोव्हेशन, इंटरॅक्शन, कोलॅबोरेशन, आंत्रप्रुनरशिप

व सस्टेनेबल ग्रोथ म्हणजेच नवीन शोध व नवनिर्मिती, परस्पर संवाद, संयुक्त प्रयास, उद्यमशीलता व शाश्वत विकास अशी फर्स्ट संडे ची पंचसूत्री आहे.

पण हे सर्व कुठल्या परिघात? आपल्या आसपास आपण अनेक समस्यांना सामोरे जातो. किंवा अनेक समस्या पाहत असतो. त्या आपल्याशी निगडीत असतात किंवा थेट जरी नागडीत नसल्या तरी कुठेतरी आपल्यावर परिणाम करणाऱ्या असतात. आपल्या ग्रुपच्या सदस्यांच्याचेच बरेच प्रॉब्लेम्स असतात. वैयक्तिक, घरगुती, कौटुंबिक, व्यावसायिक, आरोग्याशी निगडीत, शैक्षणिक, सामाजिक असे अनेक इश्युज असतात. अनेक ठिकाणी फसवणुकीला, अन्यायाला, अत्याचाराला, गुंडगिरीला सामोरे जावे लागते. अगदी हा अन्याय, फसवणूक, गुंडगिरी, अगदी कुणाकडूनही होऊ शकते, अगदी जवळच्या व्यक्तीकडून देखील. अशा परिस्थितीत मग कोणीच मदतीला येत नाही. पैश्याची मदत सोडा, साधा तात्विक अथवा भावनिक पाठिंबा देखील कुणी देत नाही. आणि हा एक अतिशय वाईट व दुर्दैवी अनुभव असतो. असा अनुभव आलेली व्यक्ती मग अशाच परिस्थितीत सापडलेल्या दुसऱ्या व्यक्तीला मनापासून पाठिंबा देण्यास तयार नसते, याचे कारण म्हणजे, माझ्यावर अशी वेळ आली तेव्हा सगळे गम्मत बघत बसले होते, मदतीला कुणी आले नाही, वरून उपदेशाचे डोस पाजले, हा राग. हे चक्र सुरु झाले कि थांबवणे फार कठीण. माणुस विचाराने व आचाराने संकुचित होत जातो. मला काय मिळणार हे प्रथम बघतो, ते मिळाले कि ओळख पण विसरतो. मनुष्यत्वाची मूळ ओळख म्हणजे संवेदनशील, सर्जनशील, समाजप्रिय, माणुसकी, परस्पर आदर, प्रेम व आपुलकी, निस्वार्थ मैत्री व नाती जपण्याची प्रेरणा हे सर्व विसरून जातो. माणूस संकुचित झाला कि कुटुंब संकुचित विचाराचे होते आक्रसले जाते. याचेच प्रतिबिंब मग समाजात पडते. समाज आत्मकेंद्री होतो. आत्मकेंद्री समाज हळूहळू लयाला जातो.

या चक्राला तोडण्यासाठी प्रथम या संकुचित वर्तुळाबाहेर पडणे आवश्यक असते. एक सकारात्मक वातावरण तयार करावे लागते. एक पिढी म्हणून या पिढीतल्या वरिष्ठ सदस्यांची जबाबदारी असते कि आपल्याला मिळालेले अनुभवावर आधारित ज्ञान, आयुष्याबद्दल निर्माण झालेला दृष्टिकोन, चांगल्या गोष्टी तसेच पुढच्या पिढीला अडचणीच्या ठरू शकतील अशा धोक्यांची जाणीव त्यांना करून देण्याची प्रेरणा, या वारसा म्हणून त्या पिढीला सुपूर्द करणे आवश्यक असते. त्यासाठी निर्मळ संवाद आवश्यक असतो व त्यासाठी वेळ द्यावा लागतो. फर्स्ट संडे ची प्रेरणा हि आहे. महिन्यातून एकदा सकारात्मक ऊर्जेचा बूस्टर डोस, मिळावा, एकमेकांकडून प्रथम ग्रुपमधील इतर सदस्यांना त्यांच्या कार्यासाठी रचनात्मक पाठिंबा मिळावा, एक प्रचंड सकारात्मक वातावरण तयार व्हावे त्यातून परस्पर सामंज्यस्य वाढावे, त्यातून काही चांगल्या प्रकल्पांची निर्मिती व्हावी, त्यात सदस्यांनी एकमेकांबरोबर सद्हेतूने व प्राजंळपणे आपल्या कुवतीनुसार काम करावे, चांगल्यातुन चांगल्याची निर्मिती व्हावी हा फर्स्ट संडे या मंचाचा उद्देश आहे. याची अत्यंत सुंदर सुरवात झाली आहे व इतर सामाजिक मंचांपेक्षा हा विचारमंच व कृतीमंच वेगळा आहे याची जाणीव येथील सदस्यांना आहे.

डॉ संदीप कडवे यांनी यापूर्वी ३० वर्षे जगभर अनेक क्षेत्रात सर्वोच्च पदावर काम केले आहे. भांडवली बाजार, मॅनेजमेंट कन्सल्टन्सी, आय टी, शिपिंग, इंजिनीरिंग,

रिअल इस्टेट, ई बिझनेस, एम ई पी, केमिकल, प्लास्टिक, हेवी इंजिनीरिंग, ॲग्री, व्हेंचर कॅपिटल, स्टार्ट अपस अशा अनेक क्षेत्रात त्यांनी भारतात व परदेशात काम केले आहे. सध्या इन्क्युबेट पार्टनर्स व विश्व पांथस्थ या दोन कंपन्या आहेत. स्टार्ट अप, एस. एम. ई. उद्योजक, बिझनेसमन, सी. इ. ओ. इन्वेस्टर्स यांना बिझनेस मेंटरींग, इनक्यूबेशन, टर्न अराउंड, फंड रेसिंग, पोर्टफोलिओ मॅनेजमेंट, ट्रेनिंग, अशा सेवा इन्क्युबेट पार्टनर्स तर्फे पुरवल्या जातात. भविष्यात शंभर करोड रुपयांपर्यंत इन्व्हेस्टमेंट करण्यासाठी एक फंड तयार करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

डॉ के सी मोहिते हे शिरूरच्या सी. टी. बोरा कॉलेजचे प्राचार्य व पुणे युनिव्हर्सिटीचे सायन्सचे पूर्वीचे डीन. मोहिते सरांना सोलर एनर्जी, उद्यमशीलता या क्षेत्रात पूर्वीपासून खूप रस आहे. डॉ. नरेंद्र जाधव कुलगुरू असतांना त्यांनी अविष्कार या उपक्रमाचे यशस्वी संयोजन केले होते. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना पी.एच.डी साठी मार्गदर्शन केले आहे. पुणे विद्यापीठाने यु. ए. ई. मध्ये रास अल खेमा येथे भारताबाहेरच्या पहिले सेंटर सुरु केले होते त्याचे ते प्रमुख होते. त्याच वेळी त्यांचा डॉ.संदीप कडवे यांच्याशी ओळख झाली. फर्स्ट संडे या उपक्रमाचे डॉ.मोहिते हे सहसंस्थापक आहेत. पुणे युनिव्हर्सिटीमध्ये फर्स्ट संडे च्या मिटींग्स ठेवाव्यात हि सूचना त्यांचीच. या उपक्रमात ते त्यांचा मुलगा सोहंम मोहिते यांच्यासहित सामील होतात. सोहंम मोहिते एका कॉलेजमध्ये प्राध्यापक आहेत व आंत्रप्रुनरशिप व इनोवेशन सेलचे प्रमुख आहेत. दोघेही अतिशय तळमळीने ते मीटिंगमध्ये सहभागी होतात. स्टार्ट अप्स ला तसेच परस्पर संवाद वृद्धिंगत होण्यासाठी फर्स्ट संडे चा हा अतिशय जरुरीचा व उपयुक्त उपक्रम आहे व या उपक्रमाच्या वाढीसाठी डॉ.मोहिते अतिशय आग्रही आहेत. त्यांचे बहुमोल मार्गदर्शन सदस्यांना होत असते.

प्रवीण वाकोडे यांनी एरोनॉटिक्स मधून एम.टेक. केले आहे व यंग सायंटिस्ट म्हणून त्यांना गौरवण्यात आलेले आहे. स्पेस थिम पार्क हा प्रोजेक्ट ते करत आहेत व त्यासाठी गेल्या सहा महिन्यात त्यांनी भांडवल उभारणीसाठी बरीच मजल मारली आहे. पुण्यातील पहिल्या मीटिंग पासून प्रवीण फर्स्ट संडे शी जोडले गेले. इथे आल्यावर मला प्रचंड पॉसिटीव्ह वाईब मिळते, सकारात्मक ऊर्जा मिळते. इथल्या चर्चेचा मला माझ्या वैयक्तिक आयुष्यात व माझ्या प्रोजेक्ट साठी खूप उपयोग झाला. म्हणून मी न चुकता प्रत्येक फर्स्ट संडे ची मीटिंग अटेंड करतो. प्रवीण वाकोडेंची प्रतिक्रिया म्हणजे उपक्रम योग्य दिशेने चालू आहे याची खात्रीच होती. निलेश इनामदार हे आंतरराष्ट्रीय पातळीवर एन्व्हायर्नमेंट, एनर्जी व रसायकलिंग या क्षेत्रात काम करणारे यशस्वी उद्योजक. पॉलिमर मधून मोनोमर या टेकनॉलॉजिचे पेटंट त्यांच्याकडे आहे. पूर्वी प्राज इंडस्ट्री व नंतर दुबई मध्ये कामाचा अनुभव घेतल्यानंतर त्यांनी हि कंपनी सुरु केली. निलेश या उपक्रमाशी अतिशय आत्मीयतेने जोडले गेले आहेत. त्याच्या अनुभवानुसार त्यांच्याकडे देण्यासारखे खूप आहे. बिझनेससाठी प्रवास करत नसतील व पुण्यात असतील तर ते शक्यतो फर्स्ट संडेची मीटिंग चुकवत नाहीत. शैलेश खटावकर या त्याच्या चुलत भावाबरोबर ते येतात. शैलेश खटावकर देखील इंडस्ट्रियल प्रोसेसिंग प्लांट व मशीनरी या क्षेत्रात काम करतात व त्यानिमित्ताने त्यांनी जवळपास चाळीस देशांमध्ये भ्रमंती केली आहे.

स्वतःचा उद्योग असावा या दृष्टीने त्याचे प्रयत्न चालू आहेतच व त्यासाठी चर्चा करण्यासाठी तेही नियमितपणे फर्स्ट संडे च्या मिटींग्स ला येतात. मोहिनी भगत व योगिनी भगत भगिनी CSR व एन.जी.ओ क्षेत्रात काम करतात. कौस्तुभ नेर यांनी इंजिनीरिंग केल्यानंतर ४ वर्षे दिल्लीत राहून यु.पी.एस.सी. साठी प्रयत्न केले. आता पुण्यात स्वतःचा डिजिटल मार्केटिंग व रिअल इस्टेट चा व्यवसाय सांभाळतात. एम. एन. गुजर हे भारतात व भारताबाहेर सिनेमा डिस्ट्रिब्युशनचा व्यवसाय करतात. बहुतांशी युरोपमध्ये त्यांचे वितरणाचे मोठे जाळे आहे. विवेक जाधव हे सोलर एनर्जी, एग्रीटेक व इंजिनीरिंग क्षेत्रात काम करतात. आनंद बनसोडे हे गिर्यारोहनामधले मोठे नाव, सोलापूर मध्ये असतात, त्यांच्या ३६० स्पेस या स्पेस टूरीसम, ३६० लिमिटलेस यु, ३६० डिजिटल इन्फिनिटी व ३६० एक्सप्लोरर एल एल पी अशा चार कंपन्या आहेत. पुण्यात आले असता त्यांनीही फर्स्ट संडे च्या मीटिंगला येऊन सदस्यांशी संवाद साधला. हर्षद खोंडे यांचा टूर व ट्रॅव्हल्स चा व्यवसाय आहे. सुरेंद्र कुलकर्णी यांचा टुरिसमचा व्यवसाय आहे. यशवंतराव मोरे यांचा इंजिनीरिंग क्षेत्रातला ३० वर्षाचा अनुभव आहे, त्यांचे बारामती व पुणे असे दोन युनिट्स आहेत व विशेष म्हणजे पुणे युनिव्हर्सिटीमध्ये मीटिंग साठी ते सायकलवर येतात. सायकलिंग हा त्यांचा छंद आहे. मनीष गांधी यांचा इंजिनीरिंग प्रोडक्शन, क्वालिटी कंट्रोल मधला ३० वर्षाचा अनुभव आहे. धनश्री भावे यांचा स्वतःचा व्यवसाय आहे. श्री. बाळ पाटील, पुणे मॅनेजमेंट असोशिएशनचे अध्यक्ष व पूर्व जॉईंट डायरेक्टर एस. एम. इ. यांनी या उपक्रमात भाग घेऊन उपस्थितांना प्रोत्सहन दिले. त्यांच्या सोबत राजेशजी मित्तल, उदयोजक व आम आदमी पार्टीच्या सुरवातीच्या टीम चे सदस्य देखील मार्च च्या मीटिंग मध्ये सामील झाले होते व त्यांनी अनेक महत्वाचे मुद्दे उपस्थित केले. आय.टी. उद्योजक व ट्रेनर नितीन बांदेकर यांनी मार्चच्या मीटिंगमध्ये सामील होऊन नवउद्योजकांना सर्व तर्हेचे मार्गदर्शन व सहाय्य करण्याची इच्छा व्यक्त केली. पुण्यातील हरीश भोंडे यांचा पूर्वीचा व्यवसाय कोरोनामुळे अडचणीत सापडला, परंतु त्यांनी रिटेल कन्झ्युमर प्रॉडक्ट्स मध्ये ट्रेडिंग व डिस्ट्रिब्युशन या नवीन व्यवसायात प्रवेश केला आहे. हे सर्व सन्माननीय सदस्य स्वयंप्रेरणेने फर्स्ट संडे मध्ये सामील झाले आहेत.

फर्स्ट संडे चा नासिक चॅप्टर लगेचच म्हणजे डिसेंबर मध्ये सुरु झाला व त्यासाठी शेषगिरी चिकेरूर, नंदन देशपांडे, अजितसिंग धिंग्रा, भास्कर राव, मिलिंद तारे व धवल नांदेडकर (फुझेरा, यु. ए. ई.) यांनी पुढाकार घेतला. डिसेम्बरची पहिली मीटिंग धवल नांदेडकर यांच्या एम.आय.डी.सी. सातपूर येथील ऑफिस मध्ये झाली. जानेवारीच्या मीटिंग नंदन देशपांडे व फेब्रुवारीची मीटिंग सौ. स्नेहल पारखी व श्री. एस. डी. पारखी यांच्या ऑफिसमध्ये झाली. विक्रम पाटील, युवराज भट, दीपक रामायणे, आनंद गोरे हे सदस्य आवर्जून या मिटींग्समध्ये सहभागी झाले. शेषगिरी चिकेरूर या नवउद्योजकाने नासिकच्या सदस्यांची व्हिडीओ मुलाखत घेण्यास सुरवात केली आहे हे अत्यंत स्वागतार्ह आहे. श्री. सुमंत पारखी यांचा आय. एस. ओ. सर्टिफिकेशन, एनर्जी मॅनजमेंट सिस्टिम्स, हेल्थ सेफ्टी व कन्सल्टिंग मधला ३५ वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे व आजपर्यंत काही हजार कंपन्यांना व बिझनेस ना त्यांनी आपली सेवा पुरवली आहे. सौ. स्नेहल पारखी या आय. एस. ओ. ९००१, येऊ आर मॅनॅजमेन्ट, ॲडमिनिस्ट्रेशन, NBH मधला ३५ वर्षाचा अनुभ आहे. नंदन देशपांडे उत्तम ग्राफिक डिझायनर आणि फूड क्षेत्रात


कार्यरत आहेत. यांचा आखातात व भारतात विविध क्षेत्रातला अनुभव आहे. त्यांनी ओमकार प्रिंट्स हा व्यवसाय १९९४ पासून सुरू केला आहे. यात अनेक इंडस्ट्रीज, महापारेषण, गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक इत्यादी ग्राहक आहेत. त्यांनी ओमकार फूडस, नाशिक हा व्यवसाय गेल्या वर्षी सुरू केला. यात सर्व प्रकारचे पिठे, थालिपीठ भाजणी, उपवासाची भाजणी, उपवासाची पिठे तसेच सेंद्रिय हळद, तिखट, मसाले व वेगवेगळ्या चटण्यांचे उत्पादन करतो. उकडीचे मोदक, पुरण पोळी, गुळाच्या पोळ्या ऑर्डर प्रमाणे बनवत असतात. या व्यवसायाचे वैशिष्ट्य म्हणजे उत्पादक ते ग्राहक अशी थेट वितरण व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे ग्राहकांना ताजे, सकस आणि भेसळमुक्त पिठे घरपोच मिळतात. सध्या नाशिक, पुणे आणि मुंबई येथे उत्पादन पाठवले जाते. अजितसींग धिंग्रा यांचा मॅनुफॅक्चरिंग मधला ३० वर्षांचा अनुभव आहे व नुकतेच त्यांनी स्वतःचा बिझनेस सुरु केला आहे. अजितसिंग यांच्या प्रचंड अनुभवामुळे त्यांनी इनोव्हेशन वर भर दिला आहे, त्यांनी व त्यांच्या मुलाने एक थ्री डी प्रिंटिंग मशीन तयार केले आहे. असे अनेक प्रॉडक्ट्स बनवण्याकडे त्यांचा कल आहे. भास्कर राव यांचा लिक्विड फर्टिलायझर चा मोठा बिझनेस आहे व भारतात तसेच परदेशात त्यांनी उत्पादित केलेले प्रोडक्ट्स ते वितरित करतात. मिलिंद तारे हे नावाजलेले आर्किटेक्ट असून प्रोजेक्ट मॅनेजमेंट डिसाइन मधला त्याचा ३० वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे. दीपक रामायने हे भारतात व बहरैन मध्ये इंजिनीरिंग क्षेत्रात मोठे काम करीत आहेत. विक्रम पाटील हे अनेक उद्योजकांचे विशेषतः कृषी क्षेत्रातील नवउद्योजकांचे मार्गदर्शक आहेत. आनंद गोरे हे नवउद्योजक आहेत. धवल नांदेडकर हे भारतात नासिकमध्ये व परदेशात फुझेरा मध्ये सी.ए. व ऑडिटचा व्यवसाय अतिशय समर्थपणे गेली २० वर्षे सांभाळत आहेत. त्यापूर्वी त्यांनी काही उद्योगांची सी.ई.ओ. म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे व त्यांचे इंजिनिअरिंग, ऑटोमोबाईल व क्वारी म्हणजे खाण उद्योगातील अनुभव प्रचंड वाखाणण्यासारखा आहे. अतिशय ऑर्गनाइज्ड पद्धतीने काम करण्याकडे त्याचा कल असतो व या सर्व व्यवसायात त्यांना सौ. नीलम नांदेडकर अतिशय सर्मथपणे साथ देत आहेत. निलेश गर्गे ह्यांचे एक इंडस्ट्रियल युनिट सातपूरमध्ये आहे. अश्या अनेक दिग्गजांच्या उपस्थिती मुळे नाशिक येथील FIRST SUNDY उप्रकम नावारूपाला येतोय. नासिक मध्ये फर्स्ट संडे खूप छान काम करते आहे व लवकरच यात अनेक नवीन सदस्य सामील होणार आहेत.


फर्स्ट संडे च्या दुबई चॅप्टरची सुरवात देखील उत्साहाने झाली आहे. सायली प्रभुदेसाई, आशिष जगताप, ऍड रश्मी छाब्रा, किरण बर्कले, चंद्रशेखर जाधव, जास्मीता, प्रथमेश सटाणकर यांनी चॅप्टरमध्ये सामील होण्यासाठी उत्साह दाखवला व पाच फेब्रुवारी रोजी दुबईत यु. ए. ई. चॅप्टरची पहिली मीटिंग झाली. दुबईत आता शुक्रवार ऐवजी रविवार साप्ताहिक सुट्टी जाहीर झाली आहे, त्यामुळे सदस्यसंख्या अजून वाढेल. दुबई, शारजाह, रस अलं खेमा, फुझेरा, अबू धाबी यातील अंतरे बरेच असल्याने अजून एक कायम मीटिंग स्पॉट नक्की झाला नाही, परंतु सदस्य त्यांच्या ऑफिस मध्ये बाकी सदस्यांना आवर्जून आमंत्रित करून मीटिंग घेत आहेत. सायली प्रभुदेसाई यांची वेब डिझाईन, डिजिटल मार्केटिंगची कंपनी आहे. त्याचे दुबई व इतर देशात अनेक कंपन्या ग्राहक आहेत. आशिष जगताप यांचा एक इंजिनीरिंग मधला स्पिंडल मॅनुफॅक्चरिंग मधला विशेष बिझनेस किंवा इंडस्ट्री आहे. ऍडव्होकेट रश्मी छाब्रा यांचा वकिलीचा विशेषतः कंपन्यांना कायदेशीर सेवा पुरवण्याचा खूप वर्षांपासून व्यवसाय आहे. चंद्रशेखर जाधव हे दुबई व यु.ए.ई. तील मराठी मंडळींमध्ये खूप प्रसिद्ध

व्यक्तिमत्व आहे, त्यांचा आय. टी. व इव्हेंट मॅनजेमेंटचा व्यवसाय आहे. प्रथमेश सटाणकर हे सिविल इंजिनीअर असून शोभा ग्रुप मध्ये मोठ्या पदावर काम करतात. दुबईमध्ये फर्स्ट संडेच्या विस्तारासाठी प्रचंड स्कोप आहे व सायली व इतर सदस्य त्यासाठी तळमळीने काम करत आहेत.

फर्स्ट संडेच्या लंडन चॅप्टर ची सुरवात लवकरच होईल, सध्या तेथील सदस्य ऑनलाईन मीटिंग मध्ये सामील होतात. राहुल इथापे यांनी अतिशय कष्टाने स्वतःचा बिझनेस, स्टार्ट अप लंडनमध्ये सुरु केला आहे व त्यासाठी सध्या त्यांची भांडवल उभारणी चालू आहे. सिद्दार्थ चव्हाण यांचा पंचवीस वर्षांपासून ट्रेडिंग चा बिझनेस यु. के. मध्ये आहे व संपूर्ण युरोप मध्ये त्याचे क्षेत्र विस्तारले आहे.

असा हा नाविन्यपूर्ण उपक्रम भारतात व परदेशात विस्तारत आहे. मला बिझनेस मिळाला तरच मी सामील होईन या संकुचित नेटवर्किंग पासून दूर जाऊन, मला एका सकारात्मक मंचाशी जोडलेले आवडेल या अधिक आनंददायी संकल्पनेवर आधारित या उपक्रमाचे कौतुक करावे तेव्हढे कमीच आहे. फर्स्ट संडे मध्ये सामील झालेल्या सर्व सदस्यांचे हार्दिक अभिनंदन व उपक्रमासाठी विश्व पांथस्थ तर्फे मनापासून शुभेच्छा.





# खराखुरा पांथस्थ

**- संजय आवटे**

श्री संजय आवटे हे सध्या लोकमत चे संपादक आहेत. पत्रकारिता क्षेत्रात त्याचे बहुमूल्य योगदान आहे. एक प्रभावी वक्ता, उत्तम लेखक, सर्वसामान्य लोकांमध्ये मिसळून त्यांना प्रोत्साहन देणारे व्यक्तिमत्व म्हणून त्याची देश परदेशात ओळख आहे. त्याचा मॉर्निंग वॉक साक्षात्कार – स्वामी संजयानंद हा ब्लॉग खुप प्रसिद्ध आहे. सदरचा लेख त्यांच्या परवानगीने याच सदरातून प्रसिद्ध करीत आहोत.

'मॉर्निंग वॉक'नंतर माझी आवडती स्मूदी पित बसलो होतो. तेव्हाच, लंडनच्या एका मित्राचा फोन आला. तो मूळचा लंडनचाच. एकदम गोरा साहेब. भारतात लवकरच येणार असल्याचं सांगत होता.

या साहेब मित्राची एक गंमत सांगायला हवी. मला हा पहिल्यांदा भेटला ते सुमारे वीस वर्षांपूर्वी. तेव्हा मी सोलापुरातल्या 'संचार'चा संपादक होतो. 'गड्ड्याची यात्रा' हा सोलापुरातला मोठा इव्हेंट. काय वेगळं करता येईल, म्हणून यात्रेत फिरत होतो. तिथं हा दिसला. पुण्या–मुंबईत परदेशी पर्यटक दिसतात. पण, सोलापुरात तसं हे अपवादात्मक. मग त्याला गाठलं. गप्पा झाल्या आणि मैत्रीही. पुढं त्यानं 'संचार'साठी 'डेटलाइन लंडन' असा कॉलमही लिहिला.

हा चित्रकार. संस्कृतींचा अभ्यासक. त्याची बायको तिथं अंगणवाडी चालवते. हा दर दोन वर्षांनी एका नव्या देशात जातो. चार–सहा महिने राहातो. तिथली संस्कृती अभ्यासतो. चित्र काढतो. मी त्याला म्हटलं, पैशांचं काय! तर म्हणाला, नोकरी करतो. पैसे जमवतो. मग दोन–तीन वर्षांनी नोकरी सोडतो. जगभर भटकतो. पुन्हा दुसरी नोकरी. बाप रे! मी म्हटलं, आता कोणती नोकरी सोडलीत?' म्हणाला, लंडनच्या एका कला महाविद्यालयाचा मी डीन होतो. म्हटलं, आता परत? परत काय, एखादी नोकरी करायची. नाहीतर, ज्या कॉलेजात डीन होतो, त्याच्या बाहेर आवारात बसून ही चित्रं विकायची. चार पैसे मिळतातच.

मला धक्का बसला.

आपल्याला 'पर्मनंट' या गोष्टीचं कसलं कौतुक असतं. नोकरी कायमस्वरूपी. घर आपल्या मालकीचं. संसार कायमस्वरूपी. मुला–बाळांसाठी तजवीज. तिकडं इंग्लंड–अमेरिकेत अध्यक्ष–पंतप्रधानांची पोरं साध्या कारकुनी नोकऱ्याही करत असतात. आपल्याकडच्या गल्ली पुढाऱ्याचा सोळा वर्षांचा पोरगाही भय्यासाहेब वगैरे होऊन

रस्त्यावर झळकत असतो! असो. तर, हे सगळं 'कायमस्वरूपी' असणं वाईट आहे, असं नाही. पण, एवढं करून आपण करतो काय? 'टिकवून ठेवणं' यातच आपली सगळी ऊर्जा खर्च होते. नंतर, जगण्याचा तो एकमेव 'ड्रायव्हिंग फोर्स' होतो. बाकी, काहीच नाही. याचा अर्थ, सगळं उधळून द्यावं, फेकून द्यावं असं नाही. सांभाळावं. सावरावं. जपावं. पण, जगण्याची प्रेरणा, फक्त 'टिकवून ठेवणं' ही असू शकत नाही.

स्वतःला मोकळं सोडता आलं पाहिजे. स्वतःला सतत आजमावता आलं पाहिजे. स्वतःला नित्य तपासता आलं पाहिजे. काय हवं ते शोधता आलं पाहिजे. स्वतःला बाजारातही फेकून आपलं मूल्य जोखता आलं पाहिजे. मुख्य म्हणजे, जगता आलं पाहिजे. भरभरून, मनापासून जगता आलं पाहिजे. काही धोके असतील. कधी रस्ते चुकतील. कधी गडबडी होतील. कधी अपघात होईल. पण, हेच तर जगणं आहे. टिकून राहाणं आणि टिकवून ठेवणं याच प्रेरणा उरल्या की, माणसं स्थितीशील आणि बिचारी तर होतातच. पण, अनेकदा क्रूर, खोटारडी, कारस्थानी, पाताळयंत्रीही होत जातात. आपण प्रवासी आहोत, मुक्कामी नाही, ही खात्री पटली की जगणं किती सुंदर, प्रवाही होतं! 'सेटल' होणं म्हणजे साचणं आहे, हे मग पटू लागतं.

मला आठवतं. नगरपालिकेच्या शाळेत शिक्षक असणारे एक गुरूजी माझ्याकडं आले होते. खूप वर्षं झाली. त्यांची बदली नगरपालिकेच्या एक नंबर शाळेतून तीन नंबरला झाली होती. त्यांना ती बदली रद्द करायची होती. म्हटलं, अडचण काय आहे? तर म्हणाले, नाही. आता कसंय. रस्ता ओलांडलं की शाळा आहे. ही नवी शाळा म्हणजे दोन चौक ओलांडून जावं लागतं! तुम्ही आमदारसाहेबांशी बोललात की होऊन जाईल काम ! सीमेवर लढणा–या सैनिकांवर देशभक्तीपर गीतं बसवणारे हे शिक्षक. यांना एवढी सीमाही ओलांडायची नाही. काय बोलणार?


एरव्ही, सगळं अशाश्वत आहे. सगळी माया आहे. सारं क्षणभंगुर आहे, वगैरे म्हणणारे आपणच. पण, आपल्याएवढे भौतिकशरण आणि दांभिकही आणखी कोणी नसेल. 'आवा चालली पंढरपुरा, वेशीपासून आली घरा' असे होत जाते आपले आणि पंढरीची वाट काही केल्या सापडत नाही.

आमचा हा गोरा विठुराया मात्र खराखुरा वारकरी झालाय, असं वाटून गेलं!

– स्वामी संजयानंद

**मॉर्निंग वॉक साक्षात्कार**

**– श्री. संजय आवटे**



Why blame others for YOUR mistakes and blunders?

Own it,

It makes sense to seek timely mentoring support ... to avoid costly blunders

We provide professional mentoring support, to help you take critical and timely business and investment decisions.
From Inception .... to transformation

Write to us
mentor@in3bet.com

in3bet
Incubate Partners

Innovate
Incubate
Invest
Build
Expand
Transform

Mobile - +91 9860678844

www.in3bet.com